# मेट्रो-३च्या कामाला वेग

**मुंबई (प्रतिनिधी) :** कुलाबा ते सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पाने वेग धरला आहे. मेट्रो-३ या भुयारी प्रकल्पासाठी बोगदा वायुविजन आणि स्थानकांच्या वातानाकूलित यंत्रणेसह पर्यावरण नियंत्रण प्रणालीच्या कामाकरता 'मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन'द्वारे निविदा मागवण्यात आल्या होत्या. या कामाकरता नामांकित कंपन्यांकडून प्रतिसाद लाभला असल्याचे एमएमआरसीद्वारे सांगण्यात आले.

एमएमआरसीद्वारे कुलाबा ते सिप्झ भुयारी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या मार्गासाठी बोगदा वायुविजन आणि स्थानकांच्या वातानुकूलित यंत्रणेसह पर्यावरण नियंत्रण प्रणालीच्या बांधकामाकरता एमएमआरसीची पूर्व अर्हता बैठक नुकतीच झाली या बैठकीत नामांकित कंपन्यांनी हजेरी लावली होती. यामध्ये मे. ईटीए इंजिनीयरिंग प्रा.लि., मे. ब्ल्यू स्टार लिमिटेड, मे. वोल्टाज, मे. टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेड आणि मे. स्टर्लिंग ॲण्ड विल्सन प्रा. लि. या कंपन्यांचा समावेश होता. मेट्रो-३ साठी तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत आणि सक्षम वायुविजन, वातानुकूलित यंत्रणेचा वापर करण्याचा उद्देश असल्याचे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी सांगितले. पूर्व अर्हता निविदा २७ मेपर्यंत सादर करता येणार आहे.